Annexure-X

# मुंबई विद्यापीठ

पत्राने/हस्तेनटपका
संलग्नता/मान्यता विभाग - २
क्र. संलग्नता - २/आय सी डी/२०१३-१४/१३८९
२२ जुलै, २०१३

A. & C. COLLEGE. WADA
Date 09/06/2013
Signature
Inward No. 17

Dhanji Devsey Arts College & Commerce & Sc. Wada Dist. Palghar

प्रति,
प्राचार्य,
शिक्षक संचलित शिक्षण संस्था,
आर्टस् ॲन्ड कॉमर्स कॉलेज,
मु. पो.- वाडा,
जि. ठाणे - ४२१ ३०३.

विषय :- शासन आदेश क्रमांक- अनुदा २०११ / (२००/११)/ पुनर्बांधनी -६ / मशि-४ दि. २ जानेवारी, २०१३ अन्वये अस्तित्वात असलेल्या/नविन विद्याशाखांना १००% अनुदानावर देण्यात येत आहे.

संदर्भ :-
१) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग, कमांक एनजीसी २०१०/(११६/१०)/मशि-४, दि. १२ ऑगस्ट, २०१०.
२) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग, कमांक एनजीसी २०१०/(११६/१०)/मशि-४, दि. ०६ ऑक्टोबर, २०१०.
३) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग, कमांक एनजीसी २०१०/(११६/१०)/मशि-४, दि. ०७ ऑक्टोबर, २०१०.
४) विद्यापीठ पत्र क्र. संलग्नता/मान्यता विभाग-२/३७०९/२०१० दि. २४/०९/२०१०.
५) शासन आदेश क.: अनुदा २०११/(२००/११)/ पुनर्बांधनी -६ /मशि-४ दि. २ जानेवारी, २०१३.

महोदय,

आपल्या महाविद्यालयाच्या क. १९५/२०१०/११ दि. २९/१०/२०१०, या प्राप्त प्रस्तावानुसार आपण १००% अनुदानाकरीता अस्तित्वात असलेल्या /नवीन विज्ञान शाखाकरीता विद्यापीठास शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ करीता सादर केलेला अर्ज पहावा.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या कलम ८२ (५) मधील तरतुदीनुसार मंजूर करून अस्तित्वात असलेल्या /नवीन विद्याशाखांना शासन आदेश क.: अनुदा २०११/(२००/११)/ पुनर्बांधनी -६ /मशि-४ दि. २ जानेवारी, २०१३ अन्वये खालील अटींच्या व शर्तींच्या अधिन राहून १००% अनुदानावर मान्यता दिलेली आहे.

अटी व शर्ती :-

१. विद्यापीठाने विहित केलेल्या निकषानुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार महाविद्यालयांनी, अध्यापक वर्ग/कर्मचारी वर्ग/(पूर्णवेळ प्राचार्य/ग्रंथपाल/शिक्षक) नेमणे आवश्यक असून अशाप्रकारे नियमानुसार पात्र व विहित केलेल्या मार्गाने नियुक्त झालेल्या कर्मचा-यांच्या वेतनासाठीच अनुदान देय राहील.

२. महाविद्यालयांनी कोणत्याही परिस्थीती मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश देऊ नयेत.

३. संबंधित महाविद्यालयांनी शासन परिपत्रक क्र. एनजीसी-३५९३ /५४४३ / विशि-२, दि. २४ सप्टेंबर, १९९३ अन्वये विहीत केलेले विद्यार्थी संख्येचे निकष पूर्ण करणे आवश्यक आहे. ते पूर्ण न केल्यास अनुदान देय राहणार नाही.

४. संबंधित महाविद्यालयांनी/व्यवस्थापनांनी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना शासनाने विहित केलेल्या सेवाशर्ती व वेतनश्रेण्या लागू केलेल्या असल्या पाहिजेत.

२/-

५. संबंधित महाविद्यालयांनी शासनाच्या वेळोवेळी निघालेल्या/निर्गमित होणा-या आदेशाचे/अध्यादेशाचे (विद्यार्थी प्रवेश, गुणवत्ता, संवर्गनिहाय आरक्षण व शिक्षण शुल्क इ.) काटेकोर पालन करणे बंधनकारक राहील.

६. संबंधित महाविद्यालयांनी ज्यांची स्थापना होऊन पाच वर्ष झालेली आहेत त्यांनी एक वर्षात व ज्यांची पाच वर्ष पूर्ण झालेली नाहीत. त्यांची पाच वर्ष पूर्ण होताच एक वर्षात नॅक ॲक्रेडिएशन प्राप्त करून घ्यावे व ते या कालावधीत न मिळाल्यास सदर विद्याशाखेचे अनुदान आपोआप रद्द होईल.

७. संस्थेचे गैरप्रकार, शिक्षक निवडीमध्ये गैरप्रकार, संस्थेच्या पदाधिका-यांवर गुन्हेगारी स्वरूपाचे खटले अशा बाबी प्रलंबित नसल्याबाबत संबधित सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी खात्री करावी व तशी खात्री झाल्यानंतरच अनुदान वितरीत करावे. तसेच त्या संस्थेमध्ये अशाप्रकारचे कोणतेही गैरप्रकार नसल्याबाबत संबंधित संस्था/महाविद्यालयांनी त्यांच्या विभागीय सहसंचालकाकडे रू.१००/-च्या नॉन ज्युडीशियल स्टॅम्प पेपरवर लेखी हमीपत्र सादर करावे.

८. दुर्गम व डोंगराळ ठिकाणी असणा-या महाविद्यालयांतील विदयार्थ्यांसाठी वसतीगृहाची सोय संस्थेने स्वखर्चाने करावी.

९. संबंधित महाविद्यालयास देण्यात येणारे अनुदान महालेखापाल/शासन यांच्या तपासणीस व लेखापरीक्षणास पात्र राहील.

सदर पत्रासोबत विद्यापीठ परिपत्रक क्र. Aff./Recog.I/189, dt. 17th May, 2008 आणि परिपत्रक क्र. Aff./Recog./ICC/2012-13/17 dt. 24/08/2012 आवश्यक त्या माहिती व कार्यवाहीकरीता जोडले आहे.

आपणांस असे सुचित करण्यात येते की, विज्ञान शाखेची संलग्नता हि स्थानिक चौकशी समितीच्या अहवालाच्या व विद्यापीठाच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन देण्यात येत आहे, यास्तव विज्ञान विद्याशाखेची या पत्रान्वये दिलेली संलग्नता अंतिम समजण्यात येऊ नये.

आपला विश्वासू

(डॉ. एम. ए. खान)
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

सहपत्र:-१) परिपत्रक क्र. Aff./Recog.I/189, dt. 17th May, 2008.
२) परिपत्रक क्र. Aff./Recog./ICC/2012-13/17 dt. 24/08/2012.

Dr. Shantilal Dhanji Devsey Arts College & Commerce & Science College, Wada, Dist. Palghar

PRINCIPAL
Shikshak Sanchalit Shikshan Sanstha's
Dr.Shantilal Dhanji Devsey Arts College
& Commerce & Science College,
Wada,Dist.Palghar